!! श्री !!

# खासदार चंद्रकांत खैरे

शिवसेना उपनेते

जा.क्र. : खा.का.प्र.प ४२६ ०९०१/१६

प्रति,मा.श्री.संपादक साहेब,कृपया प्रसिद्धीसाठी

## शिवसेनेच्या ग्राहक संरक्षण कक्षामुळे ग्राहकांच्या हक्कांचे रक्षण -खासदार खैरे
## शिवसेनाप्रमुखांच्या जन्मदिनानिमित्त आयोजीत ग्राहक मेळावा उत्साहात

**संभाजीनगर दि.०९ :** शिवसेना ग्राहक संरक्षण कक्षामुळे ग्राहकांच्या हक्काचे व हिताचे संरक्षण करत आल्याने धनदांडग्या व लुटारु कंपन्यांना चाप बसला आहे. ही चळवळ अजुन तीव्र करुन ग्राहकांच्या हितासाठी लढा देऊन न्याय मिळुन देण्याचे असेच काम पुढे सातत्याने करावे असे प्रतिपादन शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांनी केले.

शिवसेनाप्रमुख श्रीमान बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मदिना निमित्त ग्राहक संरक्षण कक्षाच्या वतीने संभाजीनगर येथे ग्राहक मेळावा आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्याचे उद्घाटन खासदार चंद्रकांत खैरे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी जिल्हाप्रमुख अंबादास दानवे, शहरप्रमुख संतोष जेजूरकर, अवधूत जोशी, लक्ष्मीकांत कोळपकर, कमलेश व्यास, विजय पवार, संतोष मुळक यांची प्रमुख उपस्थितीय होती.

उद्घाटन प्रसंगी बोलतांना खासदार चंद्रकांत खैरे यांनी ग्राहक संरक्षण कक्षाच्या निर्मितीचा उद्देश समजावुन सांगत शिवसेनेचा हा लढा प्रत्येक घटकाला न्याय मिळुन देत अन्यायाला वाचा फोडण्यासाठीचा आहे. ग्राहक संरक्षण कक्षाच्या पदाधिकाऱ्यांचे कामाचे कौतुक करत यापुढेही असेच काम चालु ठेवा, आवश्यक ती मदत करु असे आश्वासन दिले. मुंबईहुन आलेल्या पदाधिकाऱ्यांनी यावेळी मेळाव्याला संबोधीत केले. मेळाव्यात महिलांची लक्षणीय उपस्थिती होती. २४ डिसेंबर १९८६ साली ग्राहकांसाठी ''ग्राहक संरक्षण कायदा'' पारीत करुन भारतीय संसदेने क्रांतीकारी पाऊल उचलले. परंतु आजही सामान्य ग्राहकांच्या हक्कांबाबत आणि कायद्याबाबत अनभिज्ञता असल्यामुळे ग्राहकांच्या हक्कांच्या रक्षणासाठी व जागरुकता निर्माण करण्यासाठी ग्राहक संरक्षक कक्षाच्या पदाधिकाऱ्यांशी संपर्क साधण्याचे आवाहन खासदार चंद्रकांत खैरे यांनी मेळाव्यात केले.

मेळावा यशस्वी करण्यासाठी प्रकाश अजमेरा, विजय अडलक, संजय जाधव, रविंद्र सोनवणे, डॉ.भागवत सुलताने, हरीभाऊ नरवडे, संजय नायक, देविदास रीठे, विष्णू जांभुरकर, राहुल जैस्वाल यांच्यासह संभाजीनगर ग्राहक संरक्षण कक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी मेहनत घेतली. यावेळी किशोर नागरे, राजेंद्र दानवे, नरेश भालेराव, चेतन गंगवाल, कमलेश गंगवाल, अनंत पाटणी, शांतीलाल पाटणी, महाविर पाटणी, आकाश अजमेरा, पड्शेट्टी अप्पा आदींसह शिवसैनिक, युवासैनिक, ग्राहक व संरक्षण कक्षाचे कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.

प्रसिध्दी प्रमुख

योगेश पायघन / गणेश वाघ.

कार्यालय : ''खैरे निवास'', वसंत भवन समोर, मच्छली खडक, संभाजीनगर-४३१ ००१. दुरध्वनी : ( ०२४० ) २३३११२५, २३३१२२५. फॅक्स : ( ०२४० ) २३४३०२५

cbkhaire@gmail.com , 8484066606/9604384400/

yp4329@gmail.com 7769052525